डॉ. सुजॉय साहा, स्नेहा भोसले, ऋषिकेश भोसले

# द्राक्ष बागेतील भुरी रोगाचे व्यवस्थापन

**पहाटे पडणाऱ्या दवामुळे बागेत आर्द्रतेचे प्रमाण वाढलेले दिसून येते. पानांवर व घडांमध्ये दव पडून जास्त वेळ ओलावा राहिल्यामुळे भुरीचा प्रादुर्भाव वाढतो. अशावेळी रोग नियंत्रणासाठी योग्य उपाययोजनांचा अवलंब करणे आवश्यक आहे.**

सध्या सर्वच भागातील द्राक्ष बागा मणी सेटिंगच्या वेगवेगळ्या अवस्थेत आहेत. सध्या वातावरणात खूप तफावत जाणवत आहे. बऱ्याचशा भागांत दिवसाचे तापमान ३० ते ३५ अंश सेल्सिअस तर रात्रीचे तापमान १० ते १२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान आढळून येत आहे. पहाटे पडणाऱ्या दवामुळे बागेमध्ये आर्द्रतेचे प्रमाण वाढलेले दिसून येत आहे. जास्त कॅनॉपी असलेल्या ठिकाणी सूर्यप्रकाश व्यवस्थित पोहोचत नाही. अशावेळी पानांवर व घडांमध्ये दव पडून बराच काळ ओलावा राहिल्यामुळे भुरीचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. दाट कॅनॉपी असलेल्या ठिकाणी फवारणीचे योग्य कव्हरेज मिळत नाही. त्यामुळे भुरी रोगावर प्रभावी नियंत्रण मिळत नाही.

## रोग नियंत्रण

**अ) निर्यातक्षम बागांमध्ये...**

- निर्यातक्षम बागांमध्ये द्राक्ष वाढीच्या अवस्थेत (छाटणीच्या ५० दिवसांनंतर) रासायनिक बुरशीनाशकांच्या फवारणीची शिफारस नसते. फवारणी केल्यास द्राक्षामध्ये बुरशीनाशकांचे अंश सापडून नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे निर्यातक्षम द्राक्ष बागांमध्ये भुरीच्या नियंत्रणासाठी सल्फरचा वापर करावा.
- काढणीच्या अवस्थेतील द्राक्ष घडावर सल्फर (४० एससी) ३ मिलि प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. या फॉर्म्यूलेशनच्या वापरामुळे द्राक्षमण्यावर सल्फर फवारणीमुळे पडणारे पांढरे डाग कमी राहण्यास मदत होईल.
- तसेच जैविक नियंत्रकांचा वापर केल्यास बुरशीनाशकांच्या फवारण्या कमी होण्यास मदत होते. अॅम्पिलोमायसीस क्विसक्वॅलीस ५ मिलि प्रतिलिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. सोबतच पोटॅशिअम बायकार्बोनेट ५ ग्रॅम किंवा कायटोसॅन ३ ग्रॅम यांचा प्रतिलिटर पाण्यातून वापर करावा.
- सध्या पडणाऱ्या थंडीमुळे बऱ्याचशा द्राक्ष बागांमध्ये पेपर रॅप केले आहे. या काळात घडामध्ये आर्द्रता वाढून भुरीचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी बागेचे नियमित निरीक्षण करणे आवश्यक आहे.
- उशिरा छाटणी झालेल्या बागांमध्ये भुरीच्या प्रादुर्भाव कमी करण्यासाठी सल्फरची फवारणी करावी. या फवारणीनंतर काढणीपर्यंतच्या काळात बॅसिलस सबटिलिस २ मिलि प्रतिलिटर पाणी याप्रमाणे दोन फवारण्या कराव्यात. यामुळे द्राक्षावरील बुरशीनाशकांचे अवशेष कमी होण्यास मदत होईल.



घडांवरील भुरी रोगाचा प्रादुर्भाव.

**ब) स्थानिक बाजारपेठेसाठी उत्पादन घेणाऱ्या बागेत (फवारणी : प्रतिलिटर पाणी)**

- हेक्झाकोनॅझोल (५ इसी) १ मिलि किंवा
- डायफेनोकोनॅझोल (२५ इसी) ०.५ ग्रॅम किंवा
- टेट्राकोनॅझोल (३.८ इडब्ल्यू) ०.७५ मिलि किंवा
- सायफ्लुफेनॅमिड (५ टक्के इडब्ल्यू) ०.५ ग्रॅम किंवा
- फ्लुओपायरम (२०० एससी) अधिक टेब्युकोनॅझोल (२००एससी) (संयुक्त बुरशीनाशक) ०.५६३ मिलि किंवा
- फ्लुक्झापायरॉक्झाईड (७५ ग्रॅम प्रति लिटर) अधिक डायफेनोकोनॅझोल (५० ग्रॅम प्रति लिटर) एसएसी) (संयुक्त बुरशीनाशक) ०.८ मिलि किंवा
- पॉलिऑक्सिन डी झिंक सॉल्ट (५ टक्के एससी) ०.६ प्रति लिटर या प्रमाणे वापर करावा.
- ट्राय अझोल वर्गातील बुरशीनाशकांचा प्रभाव वाढविण्यासाठी फवारणी मिश्रणात पोटॅशिअम बायकार्बोनेट ५ ग्रॅम प्रतिलिटर पाणी या प्रमाणे वापर करावा.

## घ्यावयाची काळजी

- बुरशीनाशक फवारणी कव्हरेज व्यवस्थितरीत्या होण्यासाठी द्राक्षघडांचा लोड योग्य राखणे आवश्यक आहे.
- बुरशीनाशके आणि जैव नियंत्रण घटक यांचे मिश्रण करू नये.
- झाडावरील ताण कमी करण्यासाठी आणि रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी जमिनीतील आर्द्रता इष्टतम असावी.
- बागेमध्ये भुरीच्या प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असल्यास, द्राक्षघडांमधील देठांवर देखील फवारणी होईल याची काळजी घ्यावी. यासाठी फवारणी डबल गनद्वारे करून द्राक्षघड पूर्णपणे धुऊन घ्यावा.

## काळ्या बुरशीचा प्रादुर्भाव

- या वर्षी बागांमध्ये डिसेंबर महिन्यामध्येच काळ्या बुरशीचा प्रादुर्भाव झालेला आढळून येत आहे. काळ्या बुरशीचा लागण साधारणतः फेब्रुवारी ते मार्च या महिन्यांमध्ये आढळून येते. परंतु सध्याच्या बदलत्या वातावरणामुळे बुरशीचा प्रादुर्भाव लवकर झालेला दिसून येत आहे.
- काळ्या बुरशीच्या प्रादुर्भावामुळे पानांवर व मण्यांवर काळ्या रंगाची पावडर दिसून येते. त्यामुळे द्राक्षांचा दर्जा खालावतो व निर्यातीस अडचणी येतात.
- प्रादुर्भावग्रस्त बागांमधील घड, सिलिकॉनयुक्त सरफॅक्टन्ट ०.३ मिलि प्रति लिटर या प्रमाणे द्रावण करून प्रादुर्भाव झालेले घड धुऊन काढावेत.



- डॉ. सुजॉय साहा, ९४५०३ ९४०५३, (प्रमुख शास्त्रज्ञ, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी, पुणे)

• कीडनाशकांच्या शिफारशी लेबल क्लेमप्राप्त किंवा जॉएंट अॅग्रेस्कोप्राप्त आहेत. • फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम फवारणी पंपासाठीचे आहे. • खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे. • बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे. • लेबल क्लेम वाचावेत. • पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत. • रसायनांचा गट तपासावा. • पीएचआय, एमआरएल तपासावेत. • पेरणी वा लागवडीपूर्वी संबंधित बियाणांवर कोणती बीजप्रक्रिया केलेली आहे, हे तपासूनच पुढील बीजप्रक्रिया करावी.


## छोट्या जाहिराती

क्लासिफाइड: सहा ओळींसाठी फक्त ५०० रुपये, पुढील प्रत्येक जादा ओळीस रु. ८५/-

विशेष योजना: २ पेड + १ फ्री, ३ पेड + २ फ्री, ५ पेड + ५ फ्री, १०पेड + १२ फ्री

### खते / औषधे

खते / औषधे विक्री

बायो-लस्टर




प्रमाण - फवारणीद्वारे १ मिली/लिटर

फळांची फुगवण, वजन, शायनिंग, शुगर व टिकवण क्षमता वाढविण्यासाठी उपयुक्त.

क्रॉप एक्सेल




प्रमाण- फवारणीद्वारे २ ते ३ ग्रॅम/लिटर जमिनीद्वारे- २ किलो/एकर

• Quick Action •

ASEAN

www.aseanagritechnologies.com

9225538175/ 9326451777

### बी - बियाणे

बियाणे / रोपे विक्री

लाकाडोंग, काळी व कस्तुरी हळद बेणे मिळेल. तसेच देशी गुलाब, गुग्गुळ, महोगनी रोपे मिळतील. पुणे. संपर्क : 9175901755.

### सल्ला- सेवा- मार्गदर्शन

शेतीविषयक चर्चासत्र/ कार्यशाळा/ प्रदर्शन

विदर्भ अॅग्रो एक्स्पो वर्ष २ रे भव्य कृषी प्रदर्शनी व कुस्ती स्पर्धा दि. २ ते ५ फरवरी २०२३ स्थळ: कन्हान, जिल्हा नागपुर संपर्क - ९२७००८६३९६, ९८९०९१८५५१

### नोकरीविषयक

नोकरी देणे

पाहिजेत- पुणे जवळ 10 एकर शेतीवर काम कराणारा 5 ते 6 वर्षे अनुभवी सुपरवायझर, भाज्यांवरील रोग व किड नियंत्रण अनुभव, माहिती व हमखास उपाय. पॉलीहाऊस मधील लाल व पिवळी ढोबळी मिरचीची संपूर्ण माहिती. शेतकरी, शेतकरी कुटुंब, मजुर व बी.एस.सी. (कृषी) (किटकशास्त्र) स्त्री, पुरुषांनी संपर्क साधावा : 9421913040.

### जलसिंचन

ठिबकसिंचन

जुने नवे ठिबक रिप्लेसमेंट आम्ही जुने ठिबक घेतो नवीन ठिबक पोहोच करतो जुने ठिबकाचे पैसे रोख देतो फक्त आमच्या कडे जगातील सर्वात स्वस्त ठिबक संपर्क- रामकृष्ण ईरिगेशन. फोन अशोक : ९९२१३३६९६०.

### ऑटोमोबाईल्स

वाहन खरेदी- विक्री

फोर्स कंपनीचा डीएक्स२५ ऑर्चड डीएलएक्स, २७ एचपी ट्रॅक्टर मॉडले २२ मे २०२२ एम एच- १७- ३२३६, टॉप कंडिशन १७५ तास घरगुती वापर विकणे आहे. संपर्क : ९८२२३४३८०८

### जाहिरातीसाठी संपर्क

• पुणे- शितल : ९९७५७६५८३८ • सातारा- संकेत : ९९७५६२६४३९
• सांगली - शीतल : ९८८११२९२९३ • नाशिक- चेतन : ९९६८६६११५८
• औरंगाबाद- दत्ता : ८६२४०२३२५६ • अहमदनगर- सचिन : ८८८८९६६५८२
• नागपूर- प्रशांत : ८८८८७९८६०० • अकोला- महेश : ९०११०६१९३३
• जळगाव- भूषण : ९९६०४११११६ • सोलापूर- पियुष : ९३७३९७९८०८


अॅग्रोवन सकाळ मीडिया प्रा. लि. ५९५ बुधवार पेठ, पुणे - ४११००२. फोन न. ०२०-२४४०५८४५ E-Mail: advt.agrowon@esakal.com